**मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्र्यांनी दिली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाची आणि बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाची केली प्रकल्प पाहणी.**

**मुंबई, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२:**

मा. मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदुमिल, दादर येथे साकार होत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ४५० फूट उंच अशा भव्य स्मारकाच्या प्रगतीचा सद्यस्थितीत सुरू असलेल्या पुतळयाच्या कामाची तसेच चौथऱ्याची तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाची पाहणी केली.

**महानगर आयुक्तांनी केले प्रकल्पांचे सादरीकरण**

महानगर आयुक्त, श्री एस. व्ही. आर. श्रीनिवास यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या कामांचे सादरीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये १००० आसन क्षमता असलेले प्रेक्षागृह, संशोधनकेंद्र, व्याख्यानवर्ग व ग्रंथालय, ध्यानकेंद्र, तळघर वाहनतळ यांची माहिती दिली. तर सद्यस्थितीत प्रकल्पाची एकूण अंदाजित प्रगती २४% असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत असे सांगितले.

तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या महापौर निवासस्थानाचे वारसा संवर्धन व जतन करणे, प्रवेशद्वार इमारतीचे बांधकाम, इंटरप्रिटेशन सेंटरचे बांधकाम, प्रशासकीय इमारतीचे बांधकाम इ. कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगितले. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे स्मारकाच्या पहिल्या टप्प्यातील ५८.३५ टक्के काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामांना नुकतीच सुरुवात झाली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात असेल विविध बाबींचा अंतर्भाव**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील पुतळ्याची उंची, पादपीठ ३० मीटर (१००फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंच अशी एकूण १३६.३८ मीटर (४५० फूट) उंची असेल व प्रवेशाद्वार इमारतीमध्ये माहिती केंद्र, तिकीट घर, लॉकर रूम, प्रसाधनगृह, सुरक्षा काऊंटर, स्मरणिका कक्ष, उपहारगृह व नियंत्रण कक्ष इत्यादी बाबींचा अंतर्भाव असेल. एकूण ४.८ हेक्टर क्षेत्रफळ जागेत स्मारकाचे काम सुरू असून बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ - ४६३८८ चौ.मी. आहे. तर हरित जागेचे क्षेत्र ६८% आहे.

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय भव्यदिव्य स्मारक लवकर व्हावं यासाठी आम्ही पाहणी केली आहे. स्मारकाच्या प्रगतीला गति देऊन हे लवकरात लवकर पूर्ण व्हावं यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, पुतळ्याचे काम लवकर पूर्ण व्हावं यासाठी, सर्वसमावेशक समिती गठित करण्यात येईल की गाझियाबादला जाऊन पुतळ्याची पाहणी करेल. तसेच हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकेरेंच्या भव्य अशा स्मारकाचे काम देखील एमएमआरडीएच्या माध्यमातून करत आहोत, जे लोकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मा. मुख्यमंत्री म्हणाले.

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्व. बाळासाहेब ठाकरेंचे जे भव्य स्मारक आकार घेत आहे. त्याचा आढावा घेणे आणि गती देणे यासाठी आम्ही  इथे आलो आहोत. मुख्यमंत्री महोदयांकडून स्मारकाचे काम लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत असे, मा. उपमुख्यमंत्री म्हणाले.

"परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय दर्ज्याच्या स्मारकाचे काम एमएमआरडीएमार्फत करत आहोत ही आमच्यासाठी एक गर्वाची बाब आहे. स्मारकाच्या बांधकामात २ प्रकारची कामे आहेत ज्यामध्ये स्थापत्य कामे मुख्य पुतळ्याची कामे आणि चौथऱ्याच्या कामांचा समावेश आहे, स्मारकाचे बांधकाम अत्यंत काळजी पूर्वक करणे गरजेचे आहे,  कारण पुतळ्याचे वजन अंदाजे ३००० टन  (४००० टन पेडेस्टलसह) आहे. तसेच स्मारकास प्रती तास सुमारे १५०००  व्यक्ती भेट देऊ शकतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे आणि बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे काम मुंबई महानगर विकास प्रधिकरणाद्वारे लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे" महानगर आयुक्तांनी सांगितले.


SITE PLAN
ENGINEERING & CONSTRUCTION
GRAND MEMORIAL OF BHARAT RATNA
DR. BABASAHEB AMBEDKAR
ARCHITECTS


CONSTRUCTION
WORK IN PROGRESS
RESTRICTED AREA




INTERPRETATION




SAFETY PARK


मा. ना. श्री. दिपक केसरकर
कॅबिनेट मंत्री, शिक्षण व पर्यावरण, महाराष्ट्र राज्य



